संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
27 OCT 2025
प्राप्त झाले सही.....................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांना सहसंचालक संवर्गात तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना..

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश :-संलेको-२०२५/प्र.क्र.४६ (भाग-१)/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७.१०.२०२५.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील (एस-२३: ६७७००-२०८७००) खालील विवरणपत्रात नमूद अधिकारी यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गात ( एस-२५: ७८८००-२०९२००) पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, सदर पदोन्नत अधिकाऱ्यांना महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतूदीनुसार स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या महसूल विभाग वाटपानूसार स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. दिपक नंदकुमार शिंदे | कोकण-२ | मुख्य लेखा अधिकारी,<br>ठाणे महानगरपालिका, ठाणे. |

२. श्री.दिलीप रा. सुर्यवंशी, मुख्य लेखा अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या बदलीचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

३. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वरील तक्त्यात नमुद उपसंचालक संवर्गातील अधिकारी श्री. दिपक शिंदे यांना खालील अटींच्या अधीन राहून सहसंचालक संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

(अ) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत असून मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.२१५/२०२३ नुसार उपरोक्त तक्त्यात नमूद अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

(ब) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क राहणार नाही.

(क) वरील अधिकाऱ्यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत स्विकारावा व कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे सादर करावे. विहित कालावधीत नियुक्ती न स्विकारल्यास अथवा पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी मुदतवाढ न मिळाल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील.

४. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांना शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ दि. १४.०७.२०२१ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(वि. अ. धोत्रे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. अप्पर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल -१/२(लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर, *
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
७. संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८. संबंधित अधिकाऱ्याचे पदोन्नतीच्या पदाचे कार्यालयाचे प्रमुख,*
९. संबंधित अधिकारी*,
१०. प्रधान सचिव (ले. व को.), यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई,
११. कक्ष अधिकारी, कोषा प्रशा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. निवड नस्ती, कोषा प्रशा-२.

(* संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)